www.ecourtsindia.com

MHKO020025422023

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ७४६/२०२३**

**निशाणी क्रमांक ११ खालील आदेश**

बँक ऑफ महाराष्ट्र
विरुद्ध
अन्नपूर्णा एंटरप्रायजेस तर्फे प्रोप्रा ऋषिकेश फराकटे

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचेविरुद्ध झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी हे शेतकरी असून त्यांना दररोज व्यवसायात गुंतून रहावे लागते. प्रतिवादी यांना संबंधीत बँकेतील आवश्यक कागदपत्रे वेळेत मिळू न शकलेने तदनंतर प्रतिवादी हे दरम्यानच्या काळात आजारी असलेने त्यांना वकीलांची भेट घेऊन कैफियत तयार करणेस विलंब झाला त्यामूळे प्रतिवादी यांना कैफियत मुदतीत दाखल करता आली नाही. प्रतिवादी यांनी कैफियत देणेस जाणूनबुजून हयगय अथवा टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर आलेस यातील वादींचे काहीही नुकसान होणार नाही याउलट प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर न आलेस प्रतिवादी यांचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे तसेच कैफियत अभिलेखावर आलेस दावेचा निकाल गुणदोषावर होणेसाठी मदत होणार आहे तरी सदर अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

०३. याउलट, वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन हरकत नोंदवून असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण अगर तसा ठोस पुरावा दिलेले नाही. प्रस्तुत अर्ज प्रतिवादीने पाच महिने इतक्या विलंबाने दाखल केलेला आहे. दिवाणी प्रकिया संहिता मधील तरतुदीनुसार कामात हजर झालेपासून ३० दिवसांचे आत कैफियत दाखल करणे बंधनकारक आहे त्यामूळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावायाचा झाल्यास प्रतिवादी यांना रक्कम रुपये २,०००/- चा दंड आकारण्यात यावा.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHKO020025422023/truecopy/order-1.pdf

०४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रतिवादी यांना दिनांक १८/०९/२०२४ रोजी दावा समन्सची बजावणी झाली आहे. त्यानंतर दिनांक ०३/०१/२०२५ रोजी नि.क्र.१ वर प्रस्तुत प्रतिवादी यांचेविरुद्ध "विना कैफियत" आदेश पारित झाला आहे. प्रस्तुत दावा व दावेचे स्वरुप पाहता वादी व प्रतिवादींचे कायदेशीर हक्क गुंतलेले आहेत हे दिसून येते त्यामूळे प्रस्तुत प्रतिवादी यांना त्यांची कैफियत मांडणेची संधी न दिलेस त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित केलेसारखे व नैसर्गिक न्यायाचा हक्क नाकारलेसारखे होईल. प्रस्तुत प्रकरण गुणदोषांवर निर्णयीत करण्यासाठी न्यायाच्या कारणास्तव प्रतिवादी यांचेविरुद्ध पारित झालेला "विना कैफियत" आदेश रद्द करणे योग्य व वाजवी होईल परंतू त्याचवेळी प्रतिवादींना झालेला विलंब दुर्लक्षित करता येणार नाही त्यामूळे प्रस्तूत अर्जाचा खर्चावर मंजूर करणे योग्य ठरेल. सबब, खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रस्तुत प्रतिवादी यांचेविरुद्ध पारित झालेला "विना कैफियत" आदेश हा रक्कम रुपये २०० /- (रुपये दोनशे मात्र) च्या खर्चावरती रद्द करणेत येतो.

३. सदर खर्चाची रक्कम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कोल्हापूर यांना अदा केलेनंतर प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2025.05.09 13:23:49 +0530

दिनांक – ०८/०५/२०२५
कोल्हापूर

( एम. एस. पाटील )
१३वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कोल्हापूर

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHKO020025422023/truecopy/order-1.pdf

www.ecourtsindia.com